www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
# युवक आधार
मराठी

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापूर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 267 वा बुधवार दि. 11 जून २०२५ किंमत : 2 रु पृष्ठ : ४
RNI MAHMAR/2023/89514

## दृष्य सत्य
### जनतेच्या नजरेतून
### शासनाच्या दरबारात

"सुभेदारी शासकीय विश्रामगृह – शासनाची कोट्यवधींची शान, पण व्यवस्थापनाच्या दुर्लक्षामुळे सध्या दुर्दशेची शोकांतिका!"




फुटक्या भिंती, तुटलेले नळ, कचऱ्याचे ढीग, दारूच्या बाटल्या आणि तंबाखूच्या रंगवलेल्या भिंती

"दैनिक युवक **आधारच्या 'दृश्य सत्यः लोकांच्या नजरेतून शासनाच्या दरबारात'** या उपक्रमातून आम्ही हा प्रश्न शासनाच्या दारात पोहोचवतो आहोत. प्रशासनाने स्वतः लक्ष देऊन स्वच्छतेसाठी पावले उचलावीत, हे ठिकाण पुन्हा त्याच्या वैभवात नांदावं हीच मागणी!"

छ. संभाजीनगर शहरातील सुभेदारी शासकीय विश्रामगृहाची काळजी घ्या – कारण हे केवळ वास्तू नाही, आपल्या छत्रपती संभाजीनगर शहराची शान आहे!

– आसाराम विरकर, उपसंपादक, दैनिक युवक आधार मराठवाडा आवृत्ती

"जनतेच्या नजरेतून – सुभेदारी शासकीय विश्रामगृहाची शान वाचवा!"

"व्हीआयपी वास्तू, पण दुर्दशेची छाया – प्रशासन लक्ष देणार का?"
"स्वच्छतेसाठी आवाज – सुभेदारी शासकीय विश्रामगृहाची हाक!"

# मुंबई महापालिकेला पडला मराठी भाषेचा विसर

**इंग्रजी भाषेतून नोटीस देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करा; शिवसेनेची (शिंदे) मागणी**



मुंबई : मुंबई महापालिकेची कामकाजाची भाषा मराठी असली तरी गेल्या काही वर्षांत प्रशासनाला मराठी भाषेऐवजी इंग्रजी भाषाच अधिक जवळची वाटू लागली आहे. मुंबई महापालिकेची परिपत्रके, नोटीसा या बहुतांशी इंग्रजी भाषेतच असतात. पावसाळापूर्व खबरदारीच्या उपाययोजनांबाबत सोसायट्यांनी इंग्रजी भाषेतून नोटीसा दिल्याबद्दल शिवसेनेने (शिंदे) आक्षेप घेतला आहे. इंग्रजी भाषेतून नोटीस देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी शिवसेनेने (शिंदे) केली आहे.

मुंबई महापालिकेचे कामकाज मराठी भाषेतून चालते हे खरे असले तरी गेल्या काही वर्षांमध्ये महापालिकेमध्ये प्रत्यक्षात परिपत्रके, अहवाल, नोटीसा इंग्रजी भाषेतूनच काढल्या जात आहेत. मुंबईत अमराठींची संख्या वाढू लागल्यामुळे इंग्रजी भाषेचा वापर वाढू लागला आहे. पावसाळ्याच्या तोंडावर डासांची पैदास होऊ नये म्हणून रहिवाशांनी कोणती काळजी घ्यावी यासाठी मुंबई महापालिकेच्या कीटकनाशक विभागाने सोसायट्यांना नोटीसा पाठवल्या आहेत. त्यात खबरदारीच्या उपाययोनजांबाबत सूचना करण्यात आल्या आहेत. डी विभाग कार्यालयानेही गिरगाव, ग्रँटरोड परिसरातील रहिवाशांना, गृहनिर्माण सोसायट्यांना नोटीसा पाठवल्या आहेत. मात्र या नोटीसा इंग्रजी भाषेत आहेत. पावसाळा जवळ आल्यावर नागरिकांनी काय काळजी घ्यावी, काय करावे, काय करू नये, डेंग्यू, हिवताप इत्यादी आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कोणती उपाययोजना कराव्या याबाबत नागरिकांचे प्रबोधन करण्यासाठी प्रशासनाने काढलेले पत्रक इंग्रजी भाषेत आहे. शिवसेनेचे (शिंदे) विभागप्रमुख दिलीप नाईक यांनी याबाबत आक्षेप घेतला आहे. यापकरणी त्यांनी पालिका आयुक्त भूषण गगराणी यांना पत्र पाठवून तक्रार केली आहे. मराठी भाषा ही आमची राजभाषा आहे. महापालिकेचा कारभार मराठी भाषेतच झाला पाहिजे. मुंबई महापालिकेने हे पत्रक सामान्य मुंबईकरांसाठी काढले आहे. मुंबईमधील नागरिकांचे प्रबोधन करण्यासाठी मराठी भाषेचा वापर करण्याचा प्रशासनाला विसर पडला हे खेदजनक आहे. सर्व सामान्यांची भाषा ही मराठी आहे. मुंबईमधील नागरिकांसाठी कोणतेही पत्रक मराठी भाषेतच असले पाहिजे. सर्वसामान्य नागरिकांमध्ये जागृती करण्यासाठी इंग्रजी भाषेत पत्रक काढणाऱ्या अधिकाऱ्यांचा निषेध. केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला. त्याचा आनंद सर्व स्तरावर व्यक्त होत असताना महापालिकेच्या कारभारात मात्र मराठी भाषेला पद्धतशीरपणे डावलण्याचे काम होत असेल तर ते धक्कादायक आहे. मराठी भाषेला डावलण्याचे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी नाईक यांनी केली आहे.

**ठाकरेंच्या मराठीच्या मुद्यावर शिवसेना (शिंदे) आक्रमक**

मराठी माणूस आणि मराठी भाषा यांना प्रतिष्ठा मिळावी या उद्देशाने बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेची स्थापना केली होती. मराठी भाषा टिकवण्यासाठी बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने नेहमीच आक्रमक भूमिका घेतली. मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्या नेतृत्वाखाली १९९५ मध्ये शिवसेना – भाजप युतीचे सरकार अस्तित्वात आले. तेव्हा बॉम्बेचे नामकरण मुंबई असे करण्यात आले. तसेच मुंबई महानगरपालिकेचा कारभार मराठी भाषेतच झाला पाहिजे असे निर्देश देण्यात आले. मुंबई महानगरपालिकेच्या सभागृहातही प्रशासनाचा कारभार मराठी भाषेतच झाला पाहिजे असा ठराव मंजूर करण्यात आला. मात्र गेल्या काही वर्षांत मुंबई महापालिकेला या ठरावाचा विसर पडला आहे. या मुद्याविरोधात आता कोणी राजकीय पक्ष आंदोलनही करीत नाही. मात्र शिवसेनेने (शिंदे) मुंबई महापालिका निवडणुकीच्या तोंडावर पुन्हा एकदा मराठीचा मुद्दा हाती घेतला आहे. राज्यात भाजप आणि शिवसेनेची सत्ता असून मराठीचा मुद्दा शिवसेनेला (शिंदे) किती लावून धरता येतो याबाबत उत्सुकता आहे.

## रिक्शा-टॅक्सी चालकांच्या समस्या सोडवण्यासाठी भाजप पुरस्कृत संघटनेची आरटीओ अधिकाऱ्यांसोबत बैठक

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी पुरस्कृत वंदे मातरम् जनरल कामगार संघटनेचे उपाध्यक्ष रवि नाईक यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी पनवेल आरटीओ अधिकाऱ्यांसोबत रिक्षा व टॅक्सी चालकांच्या समस्यांवर सविस्तर चर्चा केली. या बैठकीत मिटर रिकॅलिब्रेशन, गाडी पासिंगमधील अडथळे, व सॉफ्टवेअर अभावामुळे होत असलेल्या अडचणी यावर विशेष चर्चा झाली. अनेक चालकांना जबरदस्तीने नवीन मिटर खरेदी करण्यास भाग पाडले जात असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. रिकॅलिब्रेशन साठी आवश्यक सॉफ्टवेअर त्वरित उपलब्ध करून देण्याबाबत अधिकाऱ्यांना सूचित करण्यात आले. तसेच, कागदपत्रांच्या प्रक्रियेदरम्यान होणाऱ्या पैशांच्या मागणीबाबतही संघटनेने आवाज उठवला. यासंदर्भात तात्काळ कारवाई करण्याची मागणी करत निवेदन देण्यात आले. नवीन जीपीएस प्रणालीसंबंधी माहितीची देवाणघेवाणही यावेळी झाली. या बैठकीस वंदे मातरम् संघटनेचे सचिव रविंद्र कोरडे, अंकुश पाटील, दीपक नावडेकर, दीपक म्हात्रे, संतोष म्हात्रे, जितेंद्र म्हात्रे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. या चर्चेमुळे रिक्षा-टॅक्सी चालकांच्या प्रश्नांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा संघटनेने व्यक्त केली आहे.



## सन्माननीय राज ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून वाशिम जिल्ह्यात जाहीर पक्षप्रवेश.

दैनिक युवक आधार
उप जिल्हा प्रतिनिधी वाशिम
गजानन पवार पाटील.



वाशिम जिल्हा अध्यक्ष राजूभाऊ किडसे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच गजानन वैरागडे जिल्हा सचिव नरेंद्र भोयर जिल्हा उपाध्यक्ष जिल्हा उपाध्यक्ष अतीश डाहळे ज्ञानेश्वर भाऊ कवळी तालुकाध्यक्ष उमेश टोलमारे वाहतूक सेना शहराध्यक्ष सर्वांच्या मार्गदर्शनाखाली घेतला पक्षप्रवेश गोपाल बोरकर व संदीप बोरकर राहुल कावरे विष्णू बोरकर नंधाना तसेच राजूभाऊ हिंगणे धारपिंपरी महादेव डाखोरे गोलू हिंगणे आदित्य ढाकणे गणेश गलत रवी पवार देवठाणा खाम प्रभाकर भालेराव ईतर मंडळींनी महाराष्ट्र नवनिर्माण सेने मध्ये प्रवेश केला व सर्व सर्वांनी विकास कामांचा चंग बांधून राजूभाऊ गिरसे व गजानन वैरागडे यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याकरता सुरुवात. सन्माननीय राजसाहेब ठाकरे यांच्या विचारधारेवर विश्वास ठेवून मालेगाव तालुक्यातील देवठाणा खांब चांडस नंधाना धारपिपरी सोनाळा येथील शेकडो युवकांचा मनसे जिल्हाध्यक्ष राजू पाटील किड्से यांच्या नेतृत्वात वाशिम रेस्ट हाऊस येथे भव्यपक्ष प्रवेश उपस्थित मनसे जिल्हा सचिव तथा वाहतूक सेना जिल्हाध्यक्ष गजानन वैरागडे वाशिम मंगरूळपीर जिल्हा उपाध्यक्ष नरेंद्र भोयर मालेगाव रिसोड जिल्हा उपाध्यक्ष आशिष डहाळे मालेगाव तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर गवळी वाशिम वाहतूक सेना शहराध्यक्ष उमेश टोलमारे मालेगाव तालुका अध्यक्ष वाहतूक सेना विनोद वानखेडे इत्यादी होते.

## येरोळ व परिसरात वटपोर्णीमा साजरी

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर लातुर**
**शिरुरआनंतपाळ**

तालुक्यातील येरोळ,नागेवाडी,चामरगा, सुमठाना, पांढरवाडी परिसरातील सुवासिनींनी वटपौर्णिमा पारंपारिक पद्धतीने मोठ्या उत्साहात साजरी केली. परिसरात वडाच्या झाडाच्या ठिकाणी महिलांनी पूजेसाठी एकच गर्दी केली होती. वटपौर्णिमेला विवाहित महिला वटवृक्षाच्या मुळाशी पाणी शिंपून वडाच्या झाडाला सुताचे फेरे घालतात. ही परंपरा पिढ्यानपिढ्या चालत आलेली आहे. या परंपरेप्रमाणे वटवृक्ष असलेल्या ठिकाणी वटवृक्षाची पूजा करण्यासाठी महिला मोठ्या प्रमाणात गर्दी करतात. भारत मातेचे नाव संपूर्ण विश्वात पसरू दे, वाईट प्रवृत्तीला दूर करून चांगल्या प्रवृत्तीचा विजय कर, सर्वांना दीर्घायुष्य व आरोग्य संपन्नता लाभो, अशी प्रार्थना महिलांनी केली.

वडाचे झाड दीर्घायुषी असते, त्याप्रमाणे आपला पतीही दीर्घायुषी राहावा, तसेच पती-पत्नी मधील मधुर नाते आणखी दृढ करण्यासाठी प्रत्येक सुवासिनीने आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी वडाच्या झाडाची मनोभावाने पूजा केली. मंगळवारी सकाळपासूनच सुहासिनीमध्ये



पूजेची लगबग सुरू होती. साजशृंगार करून हातामध्ये पूजेचे ताट घेऊन परिसरातील वडाच्या झाडाला सात फेऱ्या घेऊन वडाच्या झाडाची मनापासून पूजा केली. व पुरणपोळीचा नैवद्य दाखवून हा सण ऊत्साहात साजरा करण्यात आला.

## आमदार अमित भाऊ झनक यांनी बाबुराव हिंगणे यानां एक लाख चार हजाराचा दिला धनादेश...

### रानडुकराने बाबुराव हिंगणे यांच्यावर केला होता हल्ला.

**दैनिक युवक आधार**
**वाशीम जिल्हा प्रतिनिधी**
**करण धोंगडे**



रिसोड मालेगावचे कार्यसम्राट युवा आमदार सन्माननीय अमित भाऊ झनक यांनी बाबुराव हिंगणे यांना एक लाख चार हजार आठशे रुपयांचा दिला धनादेश,बाबुराव नथुजी हिंगणे धारपिंपरी ता.मालेगाव जि.वाशिम यांच्यावर दिनांक २ डिसेंबर रोजी रानडुकराने हल्ला केला होता.आमदार अमित भाऊ झनक यांनी एक लाख चार हजार आठसे रुपयांचा धनादेश आर एफ ओ मोरे साहेब,संभाजी ब्रिगेडचे युवा दबंग जिल्हाध्यक्ष अर्जुन पाटील खरात,श्रीराम चव्हाण,शिवाजी गायकवाड साहेब यांच्या उपस्थितीत धनादेश दिला..

## सापळी.च्या उमेश सुरुसे यांनी जलसिंचन प्रकल्पां बाबत जलसंपदा मंत्री यांना दिले निवेदन.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी**
**वाशिम**
**गजानन पवार पाटील.**



वाशिम जिल्ह्यातील वाशिम तालुक्यातील नामांकित सापळी येथील युवा शेतकरी उमेश रमेश सूरुसे यांनी गावाला व शेतीसाठी मुबलक पाणी मिळण्यासाठी सापळी ला धरण मंजूर झाले असून जल सिंचन प्रकल्पां बाबत जलसंपदा कॅबिनेट मंत्री राधाकृष्ण विखे पाटील. यांना दिले निवेदन मौजे. सापळी येथील धरण मंजूर झाले असून वरिष्ठ पातळीवर कामाची दिरंगाई होत असून तरी जलसंपदा मंत्री व मंत्रालयातील पाणीपुरवठा मंत्री यांनी मंत्री महोदयांनी वरिष्ठ पातळीवर सापळी गावातील संबंधित धरणाबद्दल योग्य रीतीने पाठपुरावा करून जलद गतीने कामास गती देण्यात यावी. जेणेकरून गावाला व शेतकऱ्यांना व गुराढोरांना व आजूबाजूच्या गावांना या प्रकल्पाचा फायदा होईल अशी ग्वाही.सापळी येथील युवा शेतकरी उमेश सुरुसे व सापळी गावकऱ्यांच्या वतीने केली आहे.

सापळी गावासाठी व शेतकऱ्यांसाठी युवा शेतकरी उमेश सुरूशे यांचे महाराष्ट्र जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना दिले निवेदन

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्ष पदार्पणानिमित्त विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन शिबिर

### पनवेल एमकेसीएलच्या वतीने आयोजन




**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

दानशूर व्यक्तिमत्त्व आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांच्या वयाच्या ७५ व्या अर्थात अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केले असून त्या निमित्ताने विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन केले आहे. याच उपक्रमांतर्गत महाराष्ट्र ज्ञान महामंडळ(एमकेसीएल) पनवेल यांच्या वतीने पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील इयत्ता दहावी आणि बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी 'भरारी २०२५' हे करिअर विषयक मोफत मार्गदर्शन शिबीर पनवेल येथे आज (दि. १०) आयोजित करण्यात आले. पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झालेल्या या शिबिराचे उदघाटन प्रमुख मान्यवर लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिराला एमकेसीएलचे कोकण विभाग समन्वयक जयंत भगत, पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक अनिल भगत, पुणे एमकेसीएलचे वरिष्ठ व्यवस्थापक नटराज कटकधोंड, स्वाती जयंत भगत, एमएसआयसीटीचे विविध विभागातील अधिकृत केंद्रप्रमुख तसेच विद्यार्थ्यांसह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वतःच्या संघर्षमय कारकिर्दीची गाथा विद्यार्थ्यांसमोर मांडली. त्यांनी आपले करिअर कसे घडवले, याबद्दलची माहिती देत विद्यार्थ्यांना जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी प्रेरणा दिली आणि त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या शिबिरामध्ये प्रसिद्ध करिअर मार्गदर्शक, लेखक व व्याख्याते प्रा. विजय नवले यांनी विद्यार्थ्यांना विविध करिअरच्या संधींबाबत सखोल मार्गदर्शन केले. आधुनिक युगात केवळ पारंपरिक क्षेत्रांपुरतीच मर्यादा न राहता नवीन क्षेत्रांमध्येही भरपूर संधी उपलब्ध आहेत, हे त्यांनी उदाहरणांसह समजावून सांगितले. प्रा. नवले यांनी इंजिनिअरिंग, वैद्यकीय, व्यवस्थापन, आर्ट्स, कॉमर्स, लॉ, डिझाईन, मीडिया, उद्योजकता, स्पर्धा परीक्षा अशा विविध क्षेत्रांचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांनी आपली आवड, क्षमता आणि बाजारातील गरज यांचा समतोल साधून करिअरची दिशा निवडावी, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे संयोजन पनवेल मधील एमएस-सीआयटी केंद्रांनी केले. शिबिराच्या शेवटी उपस्थित विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी उपक्रमाचे मनःपूर्वक कौतुक केले आणि भविष्यात असे उपक्रम अधिक प्रमाणात आयोजित करण्याची मागणी केली.



## सायबर क्राईम जनजागृती कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

सायबर गुन्हेगारीही नवनवीन तंत्रज्ञानाच्या शोधाचा एक प्रमुख दुष्परिणाम आहे जागतिक समस्या आहे. अशा गुन्ह्यांत मोठ्या संख्येने महिला बळी पडतात. त्यांच्या पूर्ण सुरक्षिततेला धोका आहे. मात्र अशा प्रकारच्या सायबर गुन्ह्यांचा सामना करण्यासाठी कठोर कायदे करणाऱ्या मोजक्या देशांमध्ये भारताचा समावेश आहे. एकूण सायबर गुन्ह्यांपैकी मोठ्या संख्येने गुन्हे हे केवळ महिलांच्याच बाबतीत घडत असतात. सायबर गुन्हे विशेषकरून हॅकिंग, प्रताधिकारभंग, बाल लैंगिक चित्रण इत्यादी स्वरूपात घडताना दिसतात. याशिवाय खासगी किंवा गोपनीय माहिती चोरणे, फोडणे आदी प्रकारदेखील सायबर गुन्ह्यांमध्ये मोडतात. माहिती तंत्रज्ञानाच्या प्रसाराबरोबर सायबर गुन्ह्यांमध्ये लक्षणीय वाढ होताना आढळत आहे. यासाठी सायबर क्राईम जनजागृती कार्यक्रम राबवण्यात आला.

महिलांना सामना करावा लागत असलेले सायबर गुन्हे ई-मेलद्वारे होणारा छळ, सायबर स्टॉकिंग (STALKING) (सायबर विश्वातून होणारा पाठलाग).

आपल्या देशातील सायबर स्टॉकिंगबाबतची वास्तविकता जाणून घेणाऱ्या काही प्रातिनिधिक घटना सायबर पोर्नोग्राफी (सायबर विश्वातून पसरविली जात असलेली अश्लिलता)

सायबर डीफमेशन (बदनामी), मॉर्फिंग (संगणकाच्या माध्यमातून इंटरनेटवरील मजकूरामध्ये किंवा छायाचित्रांमध्ये फेरफार करणे), ई-मेल स्फुफिंग (ईमेलद्वारे होणारे विडंबन/टवाळी) ई आहेत.

सायबर क्राईमच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिक ते एखाद्या देशाची सर्व प्रकारची व्यवस्था ढासळू शकते, इतकी त्याची व्याप्ती व आवाका गंभीर स्वरूपाचा आहे. आज जगातील प्रत्येक क्षेत्र, व्यवसाय, इंटरनेटने प्रभावित झालेला दिसतो. इंटरनेटच्या या मायाजालाचा हॅकर अतिशय क्लुप्तीने गैरवापर करतात. करंजाडे नोडमधील नागरिकांच्या सुरक्षितेसाठी विनाशुल्क सायबर क्राईम जनजागृती कार्यक्रम करंजाडेतील नागरिकांनी आयोजित केला होता. यासाठी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मार्गदर्शन सुरू असताना अनेक नागरिकांनी प्रश्न विचारण्यात आले आणि त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. येणाऱ्या काळात सामाजिक संस्थांनी एकत्र होऊन जनजागृती करणे आवश्यक आहे. या कार्यक्रमासाठी चंद्रकांत गुजर, सहकार भारती सचिव किरण शिंदे, यांच्यासह अनेकांनी उपस्थिती दर्शवली.



## रस्त्यामध्येच वाहनांची अतिक्रमण करणाऱ्यावर आता होणार कारवाई : सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

**विंचूर : विंचूर** ( ता. निफाड )येथील मारवाडी पेठ, तसेच बाजार गल्ली, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयालगत रोड, ग्रामपालिके जवळ व श्रीराम चौक या रस्त्यावरील मोटरसायकलचे व कारचे बहुसंख्य प्रमाणात अतिक्रमणात कायम वाढत होत आहे. त्यामुळे छोटे- मोठे अपघात होत असतात. तसेच मोठ्या आवाजाचे सायलेन्सर बसविणे, मोटरसायकल गर्दीच्या मार्गावरून जोरात चालवणे, लहान मुलांच्या हातात मोटरसायकल चालविण्यास देणे, यावर लासलगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे व त्यांचे सहकारी पथक काढून यांनी वेळोवेळी या रस्त्यावरील मोटरसायकल अतिक्रमण धारकांना सूचना दिल्या, मोटरसायकलच्या टायर मधील हवा सोडून त्यांना जाणीव करून दिली, तरी पण वाहनधारक या गोष्टी विसरून पुन्हा नव्याने हे रस्त्यावर आपली वाहने उभी करतच असतात. म्हणून सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांनी वाहनधारकांना अशी सूचना केली आहे की, यापुढे कोणते वाहन रस्त्यावर अतिक्रमित दिसले तर अशा वाहनांवर दंडात्मक कारवाई करुन त्या वाहनाचे पेपर, ड्रायव्हिंग लायसन वगैरेही चेक करण्यात येईल. अशी विंचूर व विंचूर परिसरातील वाहनधारकांना त्यांनी या बातमीद्वारे सूचित करण्यात येत आहे.



# राळेगाव महाविजवितरण कंपनीच्या शहरात सक्ती च्या स्मार्ट प्रिपेड मिटर बसविण्याला शिवसेना (उबाठा) पक्षाचा निषेध विरोध

### स्मार्ट प्रिपेड मिटर बसविण्याची कार्यवाही विनाविलंब थांबविण्याची मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-**
**जितेंद्र खोडे**

**राळेगाव:-** शहरात महाविजवितरण कंपनीकडून प्रिपेड स्मार्ट मिटर बसविण्याची कार्यवाही कंत्राटदारामार्फत धडाक्यात सुरु आहे. कंत्राटदाराच्या तांत्रिक कामगाराकडुन हे मिटर आता बसविले नाही तर तुम्हाला २०,००० रुपये खर्च येऊ शकते असे भुलथापा देऊन सक्तीने हे स्मार्ट मिटर बसविण्यात येत आहे.शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे कार्यकर्ते शंकर गायधने व सुनिल क्षिरसागर यांच्या प्रयत्नातून ही सक्तिची प्रिपेड मिटर बसविण्याची कार्यवाही विनाविलंब थांबविण्यासाठी



उपविभागीय अधिकारी सुधिर पाटील यांच्याशी चर्चा करून जिल्हाधिकारी यांना निवेदन पाठविण्यात आले. उपविभागीय अधिकारी यांच्याशी चर्चेप्रसंगी विनोद काकडे (उपजिल्हा प्रमुख शिवसेना ),विजय पाटील (तालुका प्रमुख), प्रशांत वार्हेकर (उपतालुका प्रमुख),पार्बताबाई मुखरे (महिला शहर संघटिका), महिंद्रा तुमाणे,सुनिल सावरकर (उप शहर प्रमुख), श्रीकांत कोदाणे,प्रविण काळे,राजु किन्हेकार,महादेव मुखरे,संजय धोटे,शंतनू सहारे,इत्यादी शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.राळेगाव शहरात महाविजवितरण कंपनीने स्मार्ट प्रिपेड मिटर बाबतीत ग्राहकांना विश्वासात घेतले नाही या मिटर संबंधित तात्रिक माहिती कंत्राटदार किंवा महाविजवितरण कंपनी देत नाही भविष्यात हेच मिटर चार्जिंग पद्धतीने राहणार असल्याचे सांगितले जात आहे.शहरात रोज मजुरी करणारे मजुर, छोटे व्यावसायिक कमी उत्पन्न गटातील कुटूंबे महाविजवितरण कंपनीचे ग्राहक आहे स्मार्ट प्रिपेड मिटर चार्जिंग पद्धत गोर गरीब ग्राहकांना अडचणी ची ठरणार आहे. सद्या स्थितीत विजबील भरण्यासाठी पंधरा दिवसांची सवड मिळते स्मार्ट प्रिपेड मिटर मुळे भविष्यात ग्राहकावर रात्री अपरात्री चार्जिंग करणे व विज सप्लाय मिळविणे आर्थिक कमजोर ग्राहकांना खूप कठीण जाणार आहे. महाविजवितरण बसवित असलेल्या या स्मार्ट प्रिपेड मिटर चा केंद्रसरकारच्या अनुदाना व्यतिरिक्त खर्च भविष्यात ग्राहकाकडून वसुल करु शकते विज वितरण कायदा २००३ मधिल अधिनियम क्रमांक ४७(५) अन्वये कोणते मिटर वापरायचे स्वातंत्र व मिटर निवडीचा हक्क ग्राहकांना आहे.या स्मार्ट प्रिपेड मिटर च्या विरोधातील नागपूर मध्ये झालेल्या आंदोलनात आंदोलकांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे मिटर सक्तीने बसविले जाणार नाही असे आश्वासन दिले होते. जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात मिटर सक्तीने बसविण्याची कार्यवाही विनाविलंब थांबविण्यात यावी अन्यथा आंदोलन करण्याचा ईशारा देण्यात आला आहे

# नागोठणे नगरीत वटपौर्णिमा मोठ्या भक्तिभावाने उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

ज्येष्ठ पौणिमा म्हणजेच वटपौर्णिमेनिमित्त मंगळवार 10 जून रोजी येथील सी.के.पी. समाजाचे जुना रामेश्वर मंदिर व ब्राम्हण समाजाचे नवीन रामेश्वर मंदिर यांच्या समोर असलेले अवाढव्य वटवृक्षाच्या पारावर तसेच शहरातील इतर ठिकाणी असलेल्या वडाच्या वृक्षाची येथील सौभाग्यवतींनी हिरव्या बांगड्या, शेंदुर, एकगळसरी, अत्तर, कापूर, पंचामृत, पूजेचे वस्त्र, विड्याची पाने, सुपारी, दक्षणा, गूळ, खोबऱ्याचा नैवेद्य, आंबे वगैरे पाच फळे,, दुर्वा इत्यादी साहित्यासह हळद-कुंकू अक्षता वाहून मनोभावे पूजा करुन वडाला सुती दोरा गुंडाळीत पाच प्रदक्षिणा घातल्या. त्यानंतर एकमेकींना वाण देवून वटपौर्णिमा उत्साहात व भक्तिभावाने साजरी केली.वटपौर्णिमा म्हणजे नवीन लग्न झालेल्या महिलांना शृंगारासाठी पर्वणीच असते. सावित्रीने आपल्या पतीचे प्राण परत मिळविण्याकरिता यमराजाला भक्ती ने



संतुष्ट केले व आपल्या पतीचे प्राण परत मिळविले.ज्या वृक्षा खाली तो पुन्हा जिवंत झाला ते झाड वडाचे होते. त्यावेळी सावित्रीने वडाची मनोभावे पूजा केली. याप्रसंगाची आठवण म्हणून आजही स्त्रिया वडाची पूजा करतात. वड हे देवतुल्य असे झाड असून तो दिवस ज्येष्ठ महिन्यातील पौणिमेचा होता. या दिवशी भारताच्या बऱ्याच भागात अजूनही सावित्री व्रत सौभाग्यवती स्त्रिया करतात. पती व्रता स्त्री कशी असावी याचा 'सावित्री' हा आदर्श समजला जातो आणि तिची स्मृती सर्व भारतीय स्त्रियांनी दीर्घ काळापासून जागृत ठेवली आहे. सावित्रीचे चरित्र लोकप्रिय असून त्याचे अनेक ग्रंथात वर्णन केले आहे.

## HSRP नंबर प्लेट बुकींगसाठी वेबसाइटचा खोळंबा; MHO6 (RTO पेण) वाहनधारक त्रस्त; देवव्रत पाटील यांची परिवहन आयुक्तांकडे तातडीने हस्तक्षेपाची मागणी

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

MHO6 म्हणजेच पेण (रायगड) प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील हजारो वाहनधारकांना HSRP (HIGH SECURITY REGISTRATION PLATE) नंबर प्लेट बुक करताना सध्या गंभीर अडचणींचा सामना करावा लागत आहे. १ जून २०२५ पासून अधिकृत वेबसाइटवर बुकिंग करताना अनेकांना वेबसाइट सिस्टिम डाऊन, पेज न उघडणे, पेमेंट पूर्ण न होणे, स्लॉट मिळत नसणे अशा प्रकारच्या त्रुटींमुळे नाहक वेळ आणि पैसे वाया घालावे लागत आहेत.राज्य शासनाने HSRP प्लेट बसवण्याची अंतिम मुदत ३० जून २०२५ ही निश्चित केली असून, ती काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. मात्र वेबसाईटवरील अडचणींमुळे MHO6 कार्यक्षेत्रातील नागरिक अंतिम मुदतीपूर्वी ही प्लेट बसवण्यात अयशस्वी ठरू शकतात. परिणामी वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन केल्याप्रमाणे दंडात्मक कारवाईची टांगती तलवार सामान्य वाहनधारकांच्या डोक्यावर आली आहे.

या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते देवव्रत पाटील यांनी महाराष्ट्र शासनाच्या परिवहन विभागाचे आयुक्त विवेक भीमनवार यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली आहे की वेबसाईटवरील तांत्रिक त्रुटी तत्काळ दूर करण्यात याव्यात. तसेच प्रशासनाच्या अकार्यक्षमतेमुळे नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेऊन, HSRP प्लेट बसवण्याची अंतिम मुदत किमान ०१ महिन्याने वाढवण्यात यावी." त्यांनी हे देखील नमूद केले आहे की, सरकारच्या धोरणांना नागरिकांचा पाठिंबा मिळण्यासाठी सुविधा सुलभ असणे आवश्यक आहे. अन्यथा या प्रकारच्या त्रुटी लोकांच्या मनात शासनाविषयी नाराजी निर्माण करू शकतात.

**नागरिकांची मागणी:**

HSRP वेबसाईट तत्काळ सुरळीत करावी बुकिंग स्लॉट अधिक संख्येने उपलब्ध करावेत शेवटची मुदत ३१ जुलै २०२५ पर्यंत वाढवावी राज्यभरातील इतर RTO कार्यालयांमध्येही अशीच परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता, सरकारने लवकरात लवकर स्पष्ट निर्णय घेणे गरजेचे ठरत आहे.

# शिवसेना उबाठा चिपळूण तालुकाप्रमुख विनोद झगडे यांचा पदाधिकारी व असंख्य शिवसैनिकांसमवेत शिवसेना पक्षात प्रवेश

### ठाणे येथे उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, उद्योगमंत्री ना. उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला पक्षप्रवेश!

**दैनिक युवक आधार**
**चिपळूण (प्रतिनिधी):**

-- शिवसेना उबाठा चिपळूण तालुकाप्रमुख तथा माजी जिल्हा परिषद सदस्य विनोद झगडे यांनी शिवसेना उबाठा पदाधिकारी व असंख्य शिवसैनिकांसमवेत शिवसेना (शिंदे गट) पक्षात ठाणे येथे शिवसेना पक्षप्रमुख नेते तथा उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, राज्याचे उद्योग मंत्री तथा पालकमंत्री ना. उदय सामंत शिवसेना उपनेते, माजी आमदार सदानंद चव्हाण, माजी आमदार सुभाष बने यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवेश केला. या सर्वांचे ना. एकनाथ शिंदे व ना. उदय सामंत यांच्यासह नेत्यांनी स्वागत करून शिवसेनेतील पुढील राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी चिपळूण शहरप्रमुख उमेश सकपाळ, माजी जि. प. अध्यक्ष रोहन बने, दहिवली माजी सरपंच रुपेश घाग आदी उपस्थित होते. दोन वर्ष शिवसेना उबाठा चिपळूण तालुका प्रमुख पदाची जबाबदारी



सांभाळत असलेले विनोद झगडे यांनी गेल्या सुमारे दोन महिन्यांपूर्वी शिवसेना उबाठा पक्षाला राम राम ठोकला. यानंतर ते कोणत्या पक्षात प्रवेश करणार याची चर्चा सुरू होती. दरम्यान, चिपळूण दौऱ्यावर आलेले राज्याचे मुख्यमंत्री तथा पालकमंत्री ना. उदय सामंत यांनी चिपळूणमध्ये मान्सूनपूर्व घेतलेल्या आढावा बैठकीच्या पहिल्या रांगेत विनोद झगडे बसले होते. यावेळी ते शिवसेना शिंदे गटात पक्ष प्रवेश करणार असल्याचे समोर आले होते. मात्र, अधिकृतरित्या दुजारा मिळाला नव्हता. यावेळी पत्रकारांनी ना. सामंत यांना विचारले असता सध्या तरी विनोद झगडे यांनी आमची रांग स्वीकारलेली आहे. परंतु, आम्हा दोघांच्यामध्ये रोहन बने असले बसले आहेत. यामुळे आमची कोणतीही चर्चा झालेली नाही परंतु, नंतर त्यांच्याशी चर्चा करून पुढील निर्णय होईल, असे सांगितले. तसेच काही दिवसांपूर्वी झगडे यांनी रत्नागिरी येथे आपण शिवसेना शिंदे गटात प्रवेश करणार असल्याचे जाहीर केले. यानुसार सोमवारी विनोद झगडे शिवसेना उबाठा पदाधिकारी व असंख्य शिवसैनिकांचा समावेश १०० गाड्यांच्या ताफ्यासह शिवसेना शिंदे गटात प्रवेश करण्यासाठी मुंबईच्या दिशेने रवाना झाले. सोमवारी संध्याकाळी उशिरा ठाणे येथे शिवसेना वाटा तालुकाप्रमुख तथा माजी जिल्हा परिषद सदस्य विनोद झगडे यांनी माजी पंचायत समिती सदस्य राकेश शिंदे, प्रसाद लाड, बाळासाहेब शिंदे, सुधीर कदम, सतीश शिंदे, सुरेश गोलमडे सचिन बामणे यांच्यासह साठ पदाधिकारी आणि असंख्य शिवसैनिकांसमवेत शिवसेनाप्रमुख नेते तथा उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे राज्याचे उद्योग मंत्री तथा पालकमंत्री ना. उदय सामंत, माजी आमदार सदानंद चव्हाण, माजी आमदार सुभाष बने यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना (शिंदे गट ) पक्षात प्रवेश केला. यावेळी शिवसेना पक्ष प्रमुख नेते तथा उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांनी या सर्वांचे शिवसेना पक्षात स्वागत करून तुमचा पक्षात मानसन्मान राखला जाईल. तुम्ही पक्ष वाढीसाठी प्रयत्न करा, असे आवाहन केले. तर राज्याचे उद्योग मंत्री तथा पालकमंत्री ना. उदय सामंत यांनी शिवसेना पक्ष प्रमुख नेते ना. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली रत्नागिरी जिल्ह्यात परिवर्तनाची सुरुवात झाली असून या प्रवेशामुळे चिपळूणमध्ये शिवसेनेची ताकद वाढली असून पक्षाचे बळ अधिक वाढणार आहे, असे ना. सामंत यांनी यावेळी स्पष्ट केले.

# समस्त कक्कय्या समाज महासंघाचे

### मुबंईत कार्यकर्ता मार्गदर्शन शिबीर यशस्वीरित्या संपन्न !

**दैनिक युवक आधार**
**मुंबई(प्रतिनिधी**

समस्त कक्कय्या समाज महासंघ यांच्या २०२५ या रौप्य महोत्सवी वर्षाचे मंगलमय औचित्य साधून कार्यकर्ता मार्गदर्शन शिबीर आणि सामाजिक मंडळाच्या चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते. सदर चर्चा सत्राचे आयोजन ८जून २०२५रोजी मुंबईत सकाळी १०.०० वाजता राजर्षि शाहू महाराज सभागृह,दादर येथे करण्यात आले होते. यावेळी ढोर व कक्कया समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी संपूर्ण महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या संघटना,मंडळे,संस्था,फाऊंडेशन इत्यादींच्या पदाधिका-यांना उपस्थित राहून चर्चा सत्रात भाग घेतला. दीप प्रज्वलन करून सर्व महात्मे यांच्या प्रतिमेस हार अर्पण करून जय घोष केला.सामूहिक रित्या राष्ट्र गीत म्हणून देश भावना जागृत केली.त्या नंतर पेहलगाम



काश्मीर मधे अतिरेकी हल्ल्यात जे बळी पडले व समाजातील काही दुःखद मृत्यू झाले त्यांना दोन मिनिट मौन उभे राहून श्रद्धांजली वाहिली. सभेचे अध्यक्ष म्हणून निवृत्ती सावळकर यांची एकमताने निवड झाली. दोन सत्रात झालेल्या कार्यकर्ता शिबिरात अनेक समाज बांधवानी आपली मते व्यक्त केली. प्रस्तावना मधे प्रकाश दरवेशी सरचिटणीस यांनी महासंघाच्या वाटचाली बद्दल माहिती करुन दिली. मारुती सदाफुले कार्याध्यक्ष यांनी महासंघ ची सुरवात कशी झाली याची माहिती उपस्थित समाज बांधवाना दिली. निवृत्ती सावळकर यांनी अध्यक्ष म्हणून भाषण केले. त्यांनी सांगितलं ही अध्यक्ष म्हणून माझा दुसरा टर्म आहे.समाज एक केला २२जिल्हा फिरुन समाज जागृती करत आहोत.आज २२ जिल्हा अध्यक्ष कार्यरत आहेत. गाव,वाडी, शहर,जिल्हा येथे महासंघ हा रुजला आहे.तो कक्कया समाजाची गरज शासन कडून पाठपुरावा करून समाजाला हवी ती मदत देण्यासाठी तळमळीने सक्रिय आहे. समाजातील सर्व संस्था आहेत.तसेच राहतील फ़क्त आम्ही संलग्न काम करण्यासाठी तत्पर आहोत सर्वांनी एकत्र येऊन समाज उन्नती साठी झटून काम करूया असे आव्हान केले. रविंद शिंदे,महादेव शिंदे, यशवंत नारायणकर यांनी आर्थिक विकास महामंडळ मिळण्यासाठी आता पर्यंत जे प्रयत्न केले त्याचे विश्लेषण केले आणि भविष्यकाळात हे मंडळ मिळवण्यासाठी काय करावे लागेल तसेच जुलै महिन्यात अधिवेशन दरम्यान धरणे आंदोलन व मोर्चा काढावा लागेल असे सुतोवाच केले. यावेळी जेष्ठ साहित्यिक,ना.म शिंदे सोलापूर, हनुमंत सोनावणे अध्यक्ष पुणे मंडळ,लक्ष्मीदास सोनकवडे सोलापूर, नवनाथ कोकणे उपाध्यक्ष, चंद्रकांत कोकणे उपाध्यक्ष,राजेश खंदारे,दीपक खंदारे, मुकुंद सोनटक्के विठ्ठल खरटमोल,कांता तपासे,अशोक पोळ कुर्ला, शिवलिंग व्हटकर, राजा कदम,सच्चीदानंद व्हटकर यांनी महासंघाच्या मंचावरून कार्यकर्ते यांना भविष्यात ढोर समाजाला एकसंघ ठेवण्यासाठी आपले प्रबोधनात्मक मौल्यवान विचार मांडले. यावेळी समस्त कक्कया समाज महासंघाच्या वतीने विविध पदावर कार्यकर्त्यांची रीत सर पत्र देऊन नियुक्ती केली. यात राम कोकणे यांची मुबंई प्रदेश अध्यक्ष म्हूणन,संदेश शिंदे यांची मुबंई प्रदेश कार्याध्यक्ष म्हणून,सुखदेव शिंदे यांची केंद्रीय कार्यकारिणी सहसचिव म्हणून तसेच पत्रकार दत्ता खंदारे यांची प्रसिद्धी प्रमुख म्हणून,सुरेश कावळे सोलापूर यांची केंद्रीय कार्यकारिणी सचिव म्हणून तर मुकुंद सोनटक्के यांची महाराष्ट्र संघटक केंद्रीय कार्यकारिणी म्हणून महासंघाने नियुक्ती केली. मनोज शिंदे खजिनदार यांनी आभार प्रदर्शन केले तर शशिकांत सोनावणे यांनी अभ्यास पूर्वक सूत्रसंचालन केले.

## शिंपी समाज महिला विकास मंच घाटंजीचा स्त्युत्य उपक्रम

### वटसावित्री पोर्णिमेनिमित्त महिला पोलिस अधिकाऱ्यांना वृक्ष भेट देत साजरा केला पर्यावरणपूरक सण

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी (प्रतिनिधी - महेश पेंन्दोर).**

**घाटंजी -** १०/६/२०२५ रोजी घाटंजी शिंपी समाज महिला विकास मंच वतिने पोलिस स्टेशन प्रांगणात वटसावित्री पोर्णिमेच्या निमित्ताने घाटंजी येथील महिला पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना हळदी कुंकू लावत, सौभाग्य लेण्याचे भेट वस्तु देत, पर्यावरणपूरक संदेश देत वृक्ष भेट देण्यात येऊन वटसावित्री पोर्णीमा साजरी करण्यात आली. या उपक्रमामुळे सण साजरा करण्याची नवी संकल्पना पुढे आली असून, महिला पोलीस अधिकाऱ्यांनीही या उपक्रमाचे स्वागत केले.स्थानिक शिंपी सामाजिक संस्थेच्या पुढाकाराने आणि पोलीस विभागाच्या सहकार्याने हा कार्यक्रम पोलीस स्टेशन प्रांगणात पार पडला. यावेळी शिंपी समाज महीला सचिव राजश्री नमुलवार यांनी सर्वप्रथम संसाराचा गाड़ा हाकतांना सौभाग्य ची जवाबदारी सांभाळत देशसेवा,राष्ट्रसेवा,जनसेवा करणा-या कर्तव्यदक्ष महिला पोलिस कार्यचे कौतुक केले. समाजाचे अशा महिला अधिका-याचे कार्या प्रती आपल्यात अभिमान आहे. सोबत आपण समाजिक बांधिलकी जपत सदैव त्यांचे पाठीशि आहोत ही भावना रुजावी या साठी हा उपक्रम आहे



हे मत विषद केले. तदनंत महीला पोलिस कर्मचारी मेघाली जुनघरे, अनिता ठाकरे, देविका मेश्राम,सिमा राठोड़ या महीला पोलिस कर्मचारी यांना वडाचे झाड, तुळस, औषधीयुक्त वृक्ष व फुलझाडांची रोपे देण्यात आली. वटसावित्री पोर्णिमेच्या दिवशी वडाच्या झाडाची पूजा करण्याची परंपरा असून, महिलांनीही हे झाड आपापल्या घरी लावण्याचा संकल्प केला. या प्रसंगी शिंपी समाज विकास मंच घाटंजी च्या अध्यक्षा सौ. पुजा राजु दिकुंडवार, सचिव सौ राजश्री प्रशांत नमुलवार, सौ.निलम सचिन कर्णेवार, सौ मिनाक्षी ज्ञानेश्वर पोटपेलीवार, सौ पुजा उमेश अक्केवार,सौ वंदनाताई संजय दिकुंडवार, सौ नेहा सुरज दिकुंडवार,सौ वरलक्ष्मी कपोल नमुलवार, सौ संगिता गजानन दिकुंडवार सह ईतर ही शिंपी समाज महीला उपस्थित होत्या.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## हॉर्न वाजवल्याच्या रागातून सहा तरुणांनी दोघांना केली बेदम मारहाण

### चार तरुण अटकेत, दोन अल्पवयीन मुलांची सुटका

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):** मोटारसायकलवरुन जाणाऱया दोन व्यक्तींनी तीन स्कुटीवरुन रस्ता अडवून जाणाऱया सहा तरुणांना हॉर्न वाजवून बाजुला होण्यास सांगितल्याने संतप्त झालेल्या सहा तरुणांनी मोटारसायकलरील दोन्ही व्यक्तींना बेदम मारहाण केल्याची घटना शनिवारी रात्री पनवेलमध्ये घडली. या घटनेनंतर पनवेल शहर पोलिसांनी मारहाण करणाऱया या तरुणांचा शोध घेऊन त्यापैकी चार आरोपींना अटक केली आहे. तर त्यांच्या दोन अल्पवयीन साथीदारांना नोटीस बजावली आहे. या घटनेतील तक्रारदार दिपक मोहिते (46) हे पनवेलच्या साई नगरमध्ये राहण्यास आहेत. रणधीरकुमार सिंग (36) या मित्रासह आपल्या मोटारसायकलवरुन घरी जात होते. यावेळी सहा तरुण तीन स्कुटीवरुन संपुर्ण रस्ता अडवून, गप्पा मारत, रमतगमत जात असल्याने दिपक मोहिते यांनी हॉर्न वाजवुन त्यांना रस्ता सोडण्यास सांगितले. या गोष्टीचा स्कुटीवरील तरुणांना राग आल्याने त्यांनी दिपक मोहिते यांची मोटारसायकल अडवून त्यांना शिवीगाळ केली. त्यानंतर त्या सर्वांनी दिपक मोहिते व रणधीरकुमार या दोघांना भररस्त्यात लाथा बुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या मारहाणीत दोघे जखमी झाल्यानंतर सर्व तरुण आपल्या स्कुटीवरुन पळून गेले. या मारहाणीत रणधीरकुमार सिंग हे गंभीर जखमी झाले असून या दोघांनी रुग्णालयात उपचार घेऊन पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्निल केदार व त्यांच्या पथकाने या गुह्याच्या तपासाला सुरुवात केली. या गुह्यातील तरुण ज्या तीन स्कुटीवरुन आले होते, त्यातील एका स्कुटीवर नंबर नसल्याचे आढळुन आले.त्यामुळे पोलिसांनी दोन स्कुटीवरील नंबरच्या माध्यमातून शोध घेऊन दोन अल्पवयीन मुलांसह नवशाद नाशिर पटेल (27), सनाल सलीम रासलकर (19), अरमान अली शेख (19) व रिहान रसुल बागवान (18) या सहा जणांना ताब्यात घेतले. त्यानंतर यातील चार तरुणांना मारहाणीच्या गुह्यात अटक केली. या चारही तरुणांची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली असून, दोन अल्पवयीन मुलांना नोटीस देऊन त्यांची सुटका करण्यात आले आहे .

## कौटूंबिक वादातून पत्नीची हत्या करून पतीने केली आत्महत्या

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**
कौटूंबिक वादातून पत्नीची हत्या करून पतीने आत्महत्या केल्याची घटना खारघर येथील सेक्टर ३४ मधील डॉल्फीन प्राईड सोसायटीत एका धक्कादायक घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. नोतन ऊर्फ संजय सचदेव या पतीने आपली पत्नी सपना नोतन दास हिचा खून करून स्वतः आत्महत्या केली. प्राथमिक माहितीनुसार, हे दाम्पत्य मूळचे पाकिस्तानचे नागरिक असून, सहा महिन्यांपूर्वी ते पर्यटन व्हिसावर भारतात आले होते. त्यांच्यात सतत घरगुती वाद होत असल्याचे नातेवाईकांनी पोलिसांना सांगितले आहे. सकाळी त्यांची १० आणि ६ वर्षांची दोन्ही मुले शाळेत गेल्यानंतर नोतन सचदेवने स्वयंपाकघरातील चाकूने पत्नी सपनावर वार करून तिची हत्या केली. पत्नीचा खून केल्यानंतर त्याने स्वतः देखील आत्महत्या केली. मुले शाळेतून घरी परतल्यानंतर त्यांना हा प्रकार उघडकीस आला. या घटनेची नोंद खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे .

## इसम बेपत्ता

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)**
राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक इसम कोठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार त्याच्या पत्नीने पनवेल शहर पोलीस ठाण्यात केली आहे . नागनाथ जीवनाजी घावस ( ४० ) रा. पुष्पक नगर ,उंची ५ फूट ४ इंच ,बांधा सडपातळ ,रंग निम गोरा , चेहरा उभट ,केस काळे ,नाक बसके असून अंगात निळ्या रंगाचा शर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट आहे . त्याला मराठी भाषा अवगत आहे . या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पो.हवा देवेंद्र म्हात्रे यांच्याशी संपर्क साधावा .

## तरण तलावात बुडून तरुणाचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)**
शहरातील कर्नाळा स्पोर्ट्स ऍकेडमी येतील तरण तलावात आपल्या मित्रासह पोहण्यास गेलेल्या एका १८ वर्षीय तरुणाचा पाण्याचा अंदाज न आल्याने बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे . अनिष अब्दुल अलीम शेख रा. मानखुर्द असे मयत तरुणाचे नाव असून या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाणे येथे आकस्मित मृत्यू म्हणून करण्यात आली असून पुढील तपास म. सहा. पोलीस निरीक्षक सारिका झांझुर्णे करीत आहेत .

## चोरीच्या मोबाइलवरून 76 हजार लंपास

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**
तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये एका वाहन चालकाला रात्रीच्यावेळी दुकलीने लुटून त्या चालकाचे पाकीट व मोबाइल चोरी केले. चोरलेल्या मोबाइलच्या साह्याने चोरट्यांनी वाहनचालकाच्या बँक खात्यातून तब्बल ७६ हजार रुपये इतर खात्यात वळते केले. रात्र झाल्यानंतर अनेक अवजड वाहन चालक स्वताकडील वाहने रस्त्याकडेला वाहन उभे करुन तेथेच रात्र काढतात. याचाच फायदा घेऊन तळोजातील पेणधर गावाजवळील प्रिन्स काट्याजवळ रात्री एका वाहनचालकाला लुटण्यात आले. एका स्कुटीवरुन दोघे चोरटे तेथे आले. गाडीच्या उघड्या खिडकीने प्रवेश करुन त्यांनी वाहनात झोपलेल्या चालकाचे पाकीट व मोबाइल असा १२ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरला. त्यानंतर चालक दूस-या दिवशी सकाळी वाहने घेऊन पेण येथे गेल्यावर त्यांना त्यांच्या खात्यामधून ७६ हजार रुपये इतर बँकेत वळते झाल्याचे समजले. याबाबत तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली आहे.

## शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत बाफळून येथे सफेद मुसळी बियाणे वाटप

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी : राजेंद्र टोपले, सुरगाणा**





स्वदेस फाउंडेशनच्या संकल्पनेतून स्थापन झालेल्या राजधानी सुरगाणा शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत बाफळून येथे शेतकऱ्यांना सफेद मुसळी बियाण्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश पारंपरिक शेतीबरोबरच औषधी वनस्पतींचे उत्पादन वाढवून शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढवणे हा आहे. या कार्यक्रमात एकूण ५७३ किलो म्हणजे प्रत्येकी ५५ किलो प्रमाणे सफेद मुसळीचे बियाणे शेतकऱ्यांना वाटण्यात आले. कमी जागेत जास्त उत्पन्न देणाऱ्या या पीकामुळे शेतकऱ्यांना चांगला आर्थिक फायदा मिळण्याची अपेक्षा आहे. राजधानी सुरगाणा शेतकरी उत्पादक कंपनी शेतकऱ्यांना योग्य बाजारपेठ, द मूल्यवर्धन अशा सेवा पुरवून उत्पादन खर्च कमी करून उत्पन्न वाढवण्यासाठी कार्यरत असेल. या उपक्रमानंतर सफेद मुसळीच्या शेती पद्धती, उत्पादन प्रक्रिया, तांत्रिक मार्गदर्शन व विक्री यासंदर्भात नियमित मदत दिली जाणार आहे, अशी माहिती स्वदेस फाउंडेशनचे श्री. राजेंद्र गुंड व श्री. विकास वारघडे यांनी दिली. या कार्यक्रमावेळी कंपनीचे संचालक श्री. भागवत पवार, संजय गावित, रंजना चौधरी, हिरामण भोये, पांडुरंग धूम, भास्कर अलबाड, कृष्णा बोरसे, पुष्पराज गावित, देविदास धूम, कैलास जाधव तसेच स्वदेसचे प्रतिनिधी श्री. मयूर गायकवाड उपस्थित होते. परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

# केरी इंडेव्ह लॉजिस्टिक मुळे प्रचंड वाहतूक कोंडी ; वाहतूक पोलीसांच्या कारवाई वर प्रश्नचिन्ह..

### दररोजच्या रस्त्यावरील वाहतूक कोंडीमुळे वाहनचालकांचा जीव धोक्यात...

**दैनिक युवक आधार**
**पनवेल/वार्ताहर**
**कोण-** सोमटणे येथे भर रस्त्यात शेकडो ट्रक ट्रेलर कैरी इंडेव्ह लॉजिस्टिक गोडाऊनच्या अनियोजित मागणी नुसार लांबच्या लांब रांगा लावून 08 आठ तास रस्ते महामार्ग मधील एकतर्फी रस्ता अडवून उभे असतात. अनेकदा या तक्रारी वर मोठमोठ्या प्रसारमाध्यमांनी बातम्याही प्रसारित केल्या अनेक सामाजिक स्तरावरून दररोज तक्रार केल्या नंतर हि वाहतूक नियंत्रण कक्षातील पोलिसांच्या कारवाई नंतर हि अश्या प्रकारची वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटत नसल्याचे पाहत प्रवासी नागरिकांनी यावर नाराजी व्यक्त करत वाहतूक नियंत्रण पोलीस विभागाच्या कार्यपद्धती वर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. लॉजिस्टिक परवाने देताना अनेक नियम अटी सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पाळाले जावे लागते . यात रस्ते वाहतूक नियम पाळणे , पार्किंग उपलब्ध करणे, सुरक्षेच्या




दृष्टिकोनातून सोयी सुविधा बाबतीत विविध महत्वपूर्ण लॉजिस्टिक नियमांचा उल्लंघन करून करी इंडेव्ह लॉजिस्टिक आपली बेजबाबदारी सिद्ध करत आहे . ट्रक वाहतूकदारांच्या व लॉजिस्टिक कंपनीच्या मधील व्यवहारीक करारा नुसार कैरी इंडेव्ह लॉजिस्टिक येथील परिसरात स्वतःची पार्किंग जागा अनेकदा उपलब्ध नसताना पहायला मिळते, सर्रासपणे अनेक नियमांचे उल्लंघन करून या लॉजिस्टिक व्यवस्थापनाकडून शेकडो ट्रक जागा नसताना हि मालवाहतुकीसाठी मागवले जातात, त्यामुळे वाहतूकदार ट्रक चालक-मालक यांच्यापुढे सदर लॉजिस्टिक मध्ये वेळेवर पोहोचण्या शिवाय पर्याय नसतो ,परंतु येथील बेजबाबदार लॉजिस्टिक प्रशासन आपल्या व्यवस्थापनेमध्ये अनयोजित पद्धतीने काम करत असल्याने रस्ते महामार्गावर दररोज प्रवास करणाऱ्या वाहनधारकांच्या अनेक तक्रारी समोर येत असतात. नागरिकांच्या वाहतुकीत अडचणी निर्माण होत असताना वाहतूक पोलीस विभागाकडून त्यावर दंडात्मक कारवाई होते परंतु वाहतूक नियंत्रणाबाबत कुठल्याही प्रकारची ठोस सूचना किंवा पर्याय त्यावर होत नसल्याने भविष्यात अपघात जन्य परिस्थितीत अनेकांचे जीव धोक्यात टाकण्याचे कृत्य यामुळे होत आहे. सदर प्रकरणी स्थानिक पोलीस प्रशासनाने बेजबाबदार पणे वागणाऱ्या कैरी इंडेव्ह लॉजिस्टिक याबाबतच्या असंख्य तक्रारी व वाहतूक कोंडी साठी जबाबदार असल्याकारणाने त्यावर कायदेशीर गुन्हा दाखल करावा व सदर लॉजिस्टिकचे तात्काळ परवाना रद्द करण्यासाठी शासनाकडे मागणी करावी असे निवेदन क्रियाशील प्रेस क्लब च्या माध्यमातून पोलीस प्रशासना कडे पत्रकार संघटनेचे जिल्हा सचिव साबीर शेख यांनी जिल्हाध्यक्ष सय्यद अकबर यांच्याकडे केली आहे .सदर बाबतीत पत्रकार संघटनेच्या वतीने जिल्हा पोलीस वाहतूक नियंत्रण कक्ष तसेच स्थानिक प्रशासन विभागाकडेही पत्रव्यवहार करण्यात असल्याचे साबीर शेख यांनी सांगितले. अनेकदा ट्रक चालकांचा केरी इंडेव्ह लॉजिस्टिक व्यवस्थापनेच्या विरोधात मनस्ताप ऐकायला मिळाला व त्यात हजारो रुपयांचा दंड पोलीस प्रशासनाकडून वाहतूक कोंडी केल्यामुळे होत असल्याने आमचं आर्थिक नुकसान होत असुन आम्ही नेमके करायचे तरी काय हा प्रश्न हजारो ट्रक चालक-मालक व्यवसायकांकडून होत आहे . यावर तातडीने उपाय योजना न केल्यास लोकशाहीच्या मार्गाने निषेध व्यक्त करू असे पत्रकार साहेब यांनी सांगितले.

## अनधिकृत बोगस बियाण्यावर स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

### ५, ४०,०००/- मुद्देमाल जप्त

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी**
**:-जितेंद्र खोडे**
राळेगाव :-दि ०९ जून रोजी
स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ द्ववारे मिळालेल्या गोपनीय माहीतीच्या आधारे मौजा. लोणी. ता. राळेगाव येथे मोठ्या प्रमाणात शासन मान्यता नसलेल्या बोगस कपाशी बियाण्याची विक्री होत असल्याच्या माहीतीच्या आधारे पंचायत समिती, राळेगांवच्या कृषी अधिकारी मनिषा पाटील यांनी प्रशांत विठ्ठलराव भोकटे वय ४४ वर्ष यांचे घराशेजारील शेडमध्ये धाड टाकुन अनधिकृत व शासन मान्यता नसलेले बोगस कपाशी बियाणेचे एकुण ५० पाकिटे जप्त केली. जप्त केलेल्या कपाशी बियाण्याची एकूण किंमत ५.४००००/- असून केलेल्या कार्यवाहीबाबत पोलिस स्टेशन, राळेगाव येथे FIR दाखल करण्यात आला आहे. सदर



कार्यवाही कृषीविकास अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, यवतमाळ, व उपकृषी विकास अधिकारी, जि.प यवतमाळ, उपविभागीय कृषी अधिकारी यवतमाळ, व मोहीम अधिकारी यांचे मार्गदर्शनात करण्यात आली आहे.सदर कार्यवाही निलेश भोयर पंचायत समिती कळंब, राहुल वंजारी विस्तार अधिकारी (कृषी) पंचायत समिती राळेगाव यांचे चमुने यशस्वीरित्या पार पाडली आहे, शेतकऱ्यांनी कपाशी व इतर बियाणे परवानाधारक अधिकृत दुकानदारांकडूनच खरेदी करुन बियाण्या संदर्भात होणाऱ्या फसवणुकीपासून सतर्क राहण्याचे आव्हान पंचायत समिती राळेगावच्या कृषी अधिकारी मनिषा पाटील यांनी केले आहे.

लोणी येथील पोलिस पाटील पदावर काम करणाऱ्या प्रशांत विठ्ठल भोकटे हे अनेक वर्षांपासून अनधिकृत बियाणे विकण्याचा अवैध व्यवसाय करत असल्याच्या संतप्त प्रतिक्रिया उमटल्या असून या अवैध धंद्यातून खूप मोठी आर्थिक उलाढाल दरवर्षी करुन मालामाल झाल्या ची चर्चा आज माडपट्टी परिसरात सुरु होती.. असे अनेक महाभाग हा अनधिकृत बियाणे विकण्याचा अवैध व्यवसाय करताना निदर्शनास येतं आहे आणि शेतकऱ्यांना गोड बोलून हे अनधिकृत बियाणे पेरणीसाठी भाग पाडत आहेत हे विशेष...

## सणसर ग्रामपंचायतीला ग्रामसभा घेण्यात यावी म्हणून निवेदन

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**
इंदापूर तालुक्यातील सणसर ग्रामपंचायतीला ग्रामस्थ यांनी विशेष ग्रामसभा घेण्यात यावी व गावातील सर्वसामान्य नागरिक ग्रामस्थ यांच्या असणाऱ्या अडचणी व चालू असलेल्या विकासकामाची माहिती मिळण्यासाठी लवकर ग्रामसभा घेण्यात यावी म्हणून सरपंच यशवंत नरुटे पाटील यांना निवेदन देण्यात आले आहे. यावेळी सणसर मधील नागरिक सणसर सोसायटीचे चेअरमन सुशील निंबाळकर,माजी व्हा.चेअरमन किरण गायकवाड,माजी ग्रामपंचायत सदस्य शरद कांबळे,तालुका प्रमुख सुनिल निंबाळकर,युवा नेते विक्रमसिंह निंबाळकर, सामाजिक कार्यकर्ते विजय भाग्यवंत,राहुल जगताप, सुमित पाटील उपस्थित होते.



## निराधार लोकांना अन्नदान करून किमया इंगोलेने साजरा केला वाढदिवस: समाजाला दिला अनोखा संदेश

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी (प्रतिनिधी - महेश पेंन्दोर)**
आपला वाढदिवस स्वतःवर खर्च न करता, निराधार आणि गरजू लोकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवून साजरा करण्याची अनोखी परंपरा किमया प्रफुल इंगोले या चिमुकलीने याही वर्षी कायम ठेवली. गेल्या सात वर्षांपासून किमया ही प्रेरणादायी कृती करत असून, तिच्या या उपक्रमाने समाजात एक चांगला संदेश दिला जात आहे. किमयाच्या या वाढदिवसाच्या अनोख्या सेलिब्रेशनमुळे अनेक गरजू लोकांना पोटभर अन्न मिळाले आणि त्यांच्या चेहऱ्यावर समाधान व आनंद स्पष्टपणे दिसला. किमयाने स्वतःवर खर्च होणारा वाढदिवसाचा खर्च निराधार लोकांसाठी अन्नदानावर खर्च करून एक आदर्श घालून दिला आहे. तिची ही सात वर्षांपासूनची परंपरा इतरांसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे. या स्तुत्य उपक्रमाचे आयोजन सुरज हेमके यांनी केले होते, तर दर्शन मेश्राम आणि युवराज भोजवार यांनी त्यांना सक्रिय सहकार्य केले. 'जिव्हाळ्याची भिंत' या संस्थेच्या 'आनंदाने छत्र' या उपक्रमांतर्गत किमया इंगोले हिने निराधार लोकांना अन्नदान पुरवून आपला वाढदिवस खऱ्या अर्थाने सार्थकी लावला.



## पत्रकार दत्तात्रय फाळके यांनी केला वाढदिवसादिवशी मृत्यूनंतर अवयवदान करण्याचा संकल्प

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**
१० जून वाढदिवसानिमित्त तडवळे गावचे सुपुत्र , डीएसपी न्यूज लाइवचे संपादक , डिजिटल मिडीया संपादक पत्रकार संघ खटाव तालुका सहखजिनदार , पत्रकार श्री.दत्तात्रय फाळके यांनी मृत्यूनंतर देहदानाचा संकल्प केला आहे. महायुती सरकारने वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून मृत्यूनंतर देहदान करण्याचे आवाहन केले होते. त्यामुळे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे भाऊ यांच्या आवाहानाला प्रतिसाद देत पत्रकार दत्तात्रय फाळके यांनी वाढदिवसादिवशी मृत्यूनंतर देहदान करण्याचा संकल्प केला आहे. देहाचा श्वास संपला म्हणजे तो नाशवंत होत नाही. मृत्यूनंतर अवयव दानातून अनेकांना नवजीवन मिळू शकते. या भावनेने प्रेरित होऊन पत्रकार दत्तात्रय फाळके यांनी हा निर्णय घेतला आहे. यासाठी पत्रकार दत्तात्रय फाळके यांनी ऑनलाईन ( शासकीय ) स्तरावरील सर्व कायदेशीर बाबी पुर्ण केल्या असून , मृत्यूनंतर शरीराचे अवयव गरजू रूग्णांसाठी वापरण्यास परवानगी दिली आहे. अवयव दानाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी हा संकल्प महत्वाचा ठरला आहे. त्यांच्या या संकल्पामुळे अनेकांना जीवदान मिळण्यासाठी मदत होईल. डीएसपी न्यूज लाइव चॅनेलच्या सर्व पत्रकार , पदाधिकारी , तसेच मित्र व हितचिंतकांना पत्रकार दत्तात्रय फाळके यांचे हे पाऊल प्रेरणा देईल असा विश्वास व्यक्त केला आहे. माणसाचे शरीर नष्ट होते परंतु त्यांनी केलेल्या अवयव दानातून कायमस्वरूपी त्या व्यक्तीच्या अखेरच्या श्वासापर्यंत जिवंत राहतात हेच मोठे काम आहे






. पत्रकार यांनी आज वाढदिवसादिवशी अवयव दान करण्याचा संकल्प केल्यामुळे त्यांच्या या संकल्पाचे , सामाजिक उपक्रमाचे विविध स्तरातून अभिनंदन करून शुभेच्छा देण्यात येत आहेत. त्यांनी आज वाढदिवसानिमित्त मृत्यूनंतर अवयव दान करून सर्वांनीच जनजागृती करावी असे आवाहन केले आहे.

# पर्यावरण समतोलसाठी जैववैविध्याचे रक्षण व नैसर्गिक चक्रे अबाधित राखणे महत्वाचे – मंदार परांजपे

### शिवराज्याभिषेक दिनि केले प्रतिपादन

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**
आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शुक्रवार 06 जून रोजी कोकण प्रांताचे प्रज्ञा प्रवाह,प्रचार आयाम प्रमुख मंदार परांजपे,रिलायन्स सी एस आर च्या वरदा कुलकर्णी तसेच नागोठणे आयटीआयचे आय एम सी चेअरमन सुनील कदम, सिद्धार्थ भगत,स्वेता परांजपे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवराज्याभिषेक दिन विविध कार्यक्रमाने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मंदार परांजपे यांनी पर्यावरण समतोल राखणेसाठी जैववैविध्याचे रक्षण व नैसर्गिक चक्रे अबाधित राखणे महत्वाचे असल्याचे प्रतिपादन केले. संस्थेच्या सभागृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व्हिडिओ द्वारे ऑनलाइन उद्घाटन झाल्यानंतर झालेल्या स्वदेशी विचारांचा प्रचाराच्या छोटेखानी कार्यक्रमात परांजपे यांनी सांगितले की, स्वबोध-स्व ची ओळख,स्वदेशी,स्वराज्य, स्वावलंबन,स्वधर्म, कुटुंब प्रबोधन-भाषा, भूषा,भजन,भुवन,भ्रमण,भोजन, नागरी कर्तव्ये- संविधान, राष्ट्रीय प्रेरणा,





स्वातंत्र्य लढा,सांस्कृतिक वारसा,वैज्ञानिक दृष्टीकोन,सार्वजनिक संपत्तीचे रक्षण, समरसता- समरसता म्हणजे आपल्या वर्ग,जात,समुदायापेक्षा वेगळ्या समुदायांबद्दल नैसर्गिक आदरयुक्त आणि भेदभावरहित वर्तन, इतरांप्रति प्रेम आणि सौहार्दपूर्ण वर्तन हा समरसतेचा पाया आहे. संपूर्ण समाजाने अविभाजीत आणि एकमेकांविषयी प्रेमाने बद्ध असणे म्हणजे समरसता, पर्यावरण- जल, भूमी, वायु सह वनस्पति, प्राणी, सूक्ष्मजीव सृष्टीचे संरक्षण आणि संवर्धन करणे आपले कर्तव्य आहे. जल-भूमी-वायु-ध्वनि-किरणोत्सर अशा नानाविध प्रदूषणांचे प्रमाण कमीत कमी करणे, जैववैविध्याचे रक्षण करणे, नैसर्गिक चक्रे अबाधित राखणे आवश्यक असल्याचे शेवटी परांजपे यांनी सांगितले. वरदा कुलकर्णी यांनी कौशल्य विकासाबाबत आपल्या अंगी कौशल्या असेल तर आपण कोणत्याही क्षेत्रात नावीन्यपूर्ण यश मिळवू शकतो. कोणताही व्यवसाय करीत असताना एकमेकांचा हात धरून साखळी करीत पुढे जाण्याचा सल्ला दिला.सुनील कदम यांनी सदरील उपक्रम अतिशय महत्वाचा असल्याचे सांगितले. कार्यक्रमाची सुरुवात - शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचं पूजन, स्वागत गीत व पाहुण्यांचे स्वागत कातरून करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी स्वागत,शिव गीते, माता जिजाऊ यांचे गीत तसेच त्यांच्या आठवणींना उजाला देण्यात आले यावेळी पी आर पाटील यांनी शिवरायांच्या आठवणीवर एक पथनाट्य प्रशिक्षणार्थ्यांकडून सादर केलं त्यावेळी संस्थेतील खरजे सर व गौरव चव्हाण यांनी शिव गर्जना करून कार्यक्रमाची शोभा वाढविली. तसेच विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या वेशभूषेत त्यावेळचा एक प्रसंग दाखविण्यात आला. यांना मिळाले पारितोषिक - संस्थेमध्ये शिवराज्याभिषेक दिनानिमित्त रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती त्यामध्ये प्रथम क्रमांक कोमल म्हात्रे, भूमीका वारगुडे, पायल तांबोळी,व्दितीय क्रमांक यश पाटील व विघ्नेश साळुंखे,तृतीय क्रमांक अथर्व पाटील व प्रथमेश म्हात्रे यांना मिळविला या प्रशिक्षणार्थ्यांना मान्यवरांच्याहस्ते पुष्पगुच्छ व चषक देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाची प्रस्तावना एस.आर. पाटील यांनी केली असून कार्यक्रमाची यशस्वी करण्यासाठी प्राचार्य विद्या पाटील यांच्या मार्गदर्शना खाली सर्व शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी यांनी खूप मेहनत घेतली असून प्रसाद जोगत यांनी मोफत स्टेज,लाईट व स्पीकरची व्यवस्था करण्यात आली.

## 35 बांगलादेशी नागरिकांवर कारवाई

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: पनवेल शहर पोलीस ठाणे, पनवेल तालुका पोलीस यांनी केलेल्या कारवाईत 35 बांगलादेशी नागरिकांवर कारवाई करण्यात आली आहे.

पनवेल परिसरात अनेक ठिकाणी बांगलादेशी नागरिकांचे वास्तव्य आहे. अनेकदा कारवाई होऊन देखील पुन्हा बांगलादेशी नागरिक मोठ्या संख्येने राहत असल्याचे निदर्शनास येत आहेत. चिखले गावात बांगलादेशी नागरिक घरजावई बनला आहे. त्याच्यावर पाच ते सहा वर्षांपूर्वी कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर देखील तो याच ठिकाणी वास्तव्य करत आहे. खेरणे परिसरात बांगलादेशी नागरिक वास्तव्य करत असल्याची माहिती पनवेल तालुका पोलिसांना मिळाली. त्यानुसार 9 मे रोजी पोलिसांनी या ठिकाणी 23 जणांवर कारवाई केली यात 11 पुरुष आणि बारा महिलांचा समावेश आहे. तर पनवेल शहर पोलिसांना तक्का कातकरवाडी या ठिकाणी बांगलादेशी असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला. यात 12 बांग्लादेशी नागरिकांवर कारवाई करण्यात आली. यात चार पुरुष, तीन महिला, पाच मुलांचा समावेश आहे.

## भंगार मालाची चोरी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

गोडाऊनचे शटर उचकटून दोन लाख 39 हजार रुपयांचा कॉपर आणि अल्युमिनियम भंगारची चोरी केल्याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात सहा जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. मोहम्मद खान याचा धानसर गाव येथे भंगार खरेदी विक्रीचा व्यवसाय आहे. त्याने कंपन्यांकडून कॉपर आणि अल्युमिनियमचे भंगार घेतले होते. त्यांच्या गोडाऊन मधून दोन लाख 39 हजार रुपयांचे भंगार चोराने चोरून नेले.

## नाटककार दशरथ राणे शिवस्वराज्य फाऊंडेशन, महाराष्ट्र राज्य, या संस्थेच्या जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित.

**दैनिक युवक आधार**
**मुंबई:वार्ताहर**




शिवस्वराज्य फाऊंडेशन, या संस्थेने आपला वार्षिक पुरस्कार सोहळा , रत्नागिरीत, सावरकर नाट्यगृहात आयोजित केला होता,या समारंभात नाटककार दशरथ राणे यांना त्याच्या सांस्कृतिक , सामाजिक तसेच कामगार चळवळीत दिर्घ काळ दिलेल्या योगदानाची दखल घेऊन मान्यवरांच्या उपस्थित कोकण जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले नाटककार दशरथ राणे, हे पोस्टल कर्मचाऱ्या एन,एफ,पी,ई,या,संघटनेतमहत्त्वाच्या पदावर कार्यरत होते.सामाजिक क्षेत्रात अनेक संस्थामध्ये आजही ते कार्यरत असुन मराठी नाटककार संघ,मुंबईचे,खजिनदार म्हणुन त्यानी पदभार सांभाळला, आजवर नाट्यलेखनाची अनेक पारितोषिके मिळवणा-या दशरथ राणे,याची नाटके एकांकिका अशी ७६ पुस्तके प्रकाशीत असून अनेक पुस्तकांच्या ५ पासून १२ आवृत्या निघाल्या आहेत. अलिकडेच कलारंग,अलिबाग, या संस्थेने आयोजित, केलेल्या राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेत त्याच्या 'उसन्या बायकोची वरात लग्नाची, या नाटकाला प्रथम पारितोषिक मिळाले.या पुरस्कार सोहळ्यानिमित्त कार्यकर्ता या नाटकाचा प्रयोग हे पुरस्कार सोहळ्याचे आकर्षण ठरले .

## राजेंद्र सोमंवशीची उपमुख्याध्यापक पदावर पदोन्नती.

### माणकेश्वर वाचनालयाने केला सन्मान निफाडकरांनी दिल्या शुभेच्छा

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

संपुर्ण निफाड तालुक्याला परिचित असलेले... व नाशिक येथील दि. न्यू एज्युकेशन इन्सिट्युट, नाशिक या संस्थेत कार्यरत असलेले. राजेंद्र सोमवंशी सर यांची यशोदामाता डायाभाई बिटको गर्ल्स हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज च्या उपमुख्याध्यापक पदावर पदोन्नती दिल्या बद्दल. मातृसंस्था असलेल्या निफाड शहरातील व तालुक्यातील नावाजलेल्या न्यायमुर्ती महादेव गोविंद रानडे याचे स्मारक असलेले 106 वर्षाची परंपरा लाभलेले श्री. माणकेश्वर वाचनालयाच्या वतीने जंगी सत्कार करण्यात आला. यावेळी माणकेश्वर वाचनालायचे चिटणीस बाळासाहेब कापसे, अध्यक्ष मधुकर शेलार, उपाध्यक्ष डॉ. मेघा जंगम, जेष्ठ संचालक व हिशोब तपासणीस दत्ताकाका उगांवकर माजी उपाध्यक्ष मुकुंद होळकर, संचालक सुहास सुरळीकर, सुजाता तनपुरे, नईमखान पठाण, तनवीर राजे, पत्रकार राहुल दवते, डॉ महेश बनकर, राजेंद्र खालकर, सन्मित्र संजय निरभवणे, सहा. ग्रंथपाल नितीन बनसोडे व इतर कर्मचारी वृंद उपस्थित होते.

राजेंद्र सोमवंशी यांच्या पदोन्नती निमित्ताने निफाड शहरातील अनेक सामाजिक शैक्षणिक, राजकीय अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांनी कौतुक करून शुभेच्छा दिल्या यावेळी माणुसकी फौंडेशनचे अध्यक्ष सागर निकाळे, महाराष्ट्र सात, बारा न्यूज चे संपादक दिगंबर वडघुले, ज्ञानेश्वर सांगळे, राहुल कुलकर्णी आदिनी अभिनंदन केले.



# राजापूर तालुक्यातील बागवेवाडी प्रीमियर लीग (BPL) मोठ्या उत्साहात संपन्न ..

**दैनिक युवक आधार**
**राजापूर वार्ताहर**

तालुक्यातील मौजे बागवेवाडी येथील बालमित्र मंडळ बागवेवाडी या मंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या २३ व्या बागवेवाडी प्रीमिअर लीग (BPL) या भव्य ओव्हर आर्म क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत 'लब बाईट सौंदळ' या संघाने विजय मिळवला तर 'नवलादेवी क्रिकेट संघ कोंडोशी' संघ उपविजयी ठरला. या स्पर्धेला क्रिकेट रसिकांचा उदंड प्रतिसाद लाभला. बागवेवाडीतील सामाजिक कार्यकर्ते, माजी ग्रामपंचायत सदस्य आणि अजिंक्यतारा बागवेवाडी क्रिकेट संघांचे माजी कर्णधार कै.गजानन राजाराम पांचाळ यांच्या स्मरणार्थ ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत ऐकून १६ संघ सहभागी झाले होते. विजेत्या संघाना कै.गजानन पांचाळ स्मृती चषक व रोख रक्कम देऊन गौरवण्यात आले. राजापूर तालुक्यात लौकिक पावलेले आणि गजानन पांचाळ यांच्या सानिध्यात खेळेलेले उत्कृष्ट माजी क्रिकेटपटू यांना या स्पर्धेच्या







निमित्ताने विशेष सन्मानचिन्हे देऊन गौरवण्यात आले. या स्पर्धेचे उदघाटन बागवेवाडीतील सामाजिक कार्यकर्ते व तंटामुक्ती समिती अध्यक्ष श्री संजय रोडे यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ओशिवळे बागवेवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंच कु.नीलमताई हातणकर माजी उपसरपंच श्री.तुकाराम रोडे, सामाजिक कार्यकर्ते श्री.विजय गांगण, श्री.दशरथ कामतेकर, प्रख्यात भजनी बुवा श्री धोंडू पांचाळ, श्री प्रकाश बावकर, श्री संतोष कामतेकर, श्री योगेश हातणकर ,श्री संतोष आगटे, श्री संतोष पराडकर आदी ग्रामस्थांची प्रमुख उपस्थिती लाभली. या स्पर्धेला प्रथम पारितोषिक पांचाळ परिवार व द्वितीय पारितोषिक श्री.संतोष कामतेकर (आकार क्लासेस) यांच्या तर्फे तसेच इतर पारितोषिके श्री.संभाजी व श्री.चंद्रकांत कुळये यांच्या कडून देण्यात आले. या कार्यक्रमाच्या बक्षीस वितरण सोहळ्याला उपसरपंच श्री शिवरामजी कामतेकर , बागवेवाडी उत्कर्ष मंडळाचे अध्यक्ष श्री. संतोष शेट्ये , सचिव श्री विजय पांचाळ, श्री बळीराम कामतेकर, ग्रामसेवक श्री. मंगेश पांचाळ, पोस्टमास्तर श्री.एकनाथ गांगण, श्री प्रमोद बोभाटे, बुवा श्री मोहन कामतेकर, श्री ज्ञानदेव कोरगावकर, श्री दीपक रोडे आदी बागवेवाडीतील ग्रामस्थ उपस्थित राहिले . या कार्यक्रमाला संबोधित करताना बालमित्र मंडळाचे अध्यक्ष श्री. कमलेश गांगण यांनी मंडळाची २३ वर्षाची कारकीर्द ही बागवेवाडीची क्रिकेटची परंपरा ग्रामस्थांच सहकार्य आणि मंडळाच्या कार्यकर्त्यांची मेहनत याच फलित आहे असे सांगितले. तसेच मंडळाचे सचिव श्री.मनोज पांचाळ यांनी सर्व देणगीदारांचे व उपस्थित ग्रामस्थांचे सहकार्याबद्दल आभार मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश गांगण यांनी केले. या स्पर्धेसाठी पंच म्हणून महेश पांचाळ, स्वप्नील शिरसाठ, प्रवीण पराडकर, प्रशांत कामतेकर, रवींद्र पांचाळ, दिलीप गांगण यांनी जबाबदारी पार पाडली. सामन्याचे समालोचक म्हणून लांज्यातील दिनेश पांचाळ यांनी क्रीडा रसिकांचे उत्तम मनोरंजन केले. ही स्पर्धा यशस्वी होण्यासाठी मंडळाचे सदस्य राजेंद्र आगटे, संतोष पांचाळ, प्रमोद आगटे, दिगंबर गांगण, सागर रोडे, मकरंद गांगण, तुषार पांचाळ, कैलास गांगण, किरण बोभाटे, अक्षय पांचाळ, मनोज बोभाटे, प्रयाग पांचाळ यांनी प्रचंड मेहनत घेतली.

## लावणी कलावंत महासंघाचे पुरस्कार जाहीर

### शाहीर मधुकर खामकर,निर्माते उदय साटम यांच्यासह अनेकांचा समावेश



**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

लावणी कलावंत महासंघ, मुंबई यांचा ११ वा वर्धापनदिन आणि पुरस्कार सोहळा २०२५ मंगळवार, दिनांक २४ जून, २०२५ रोजी सायंकाळी ठिक ५ वाजता छत्रपती शिवाजी महाराज मंदिर, दादर येथे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात सालाबादाप्रमाणे याही वर्षी लावणी आणि लोककला क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अनेक मान्यवर कलावंतांना लावणी गौरव आणि जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.याप्रसंगी शाहीरी परंपरेतील जेष्ठ शाहीर मधुकर खामकर यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहेत, तर लावण्यवती प्रज्ञा कोळी, शाहीर दत्ताराम म्हात्रे, गायिका वंदना निकाळे, पुरुष लावणी कलाकार आनंद साटम, निर्माते उदय साटम, वादक धीरज गोरेगांवकर, नृत्यदिग्दर्शक सुभाष नकाशे, निवेदक भरत उतेकर, लोककलेसाठी सुनिल ढगे, नेपथ्य तंत्रज्ञ म्हणून सुनील देवळेकर या कलाकारांना लावणी गौरव २०२५ या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. किरण डांगे आणि सुजाता कांबळे-डांगे या कलाकार दांपत्याचा राजाराणी - २०२५ या पुरस्काराने सन्मान केला जाणार आहे. तसेच सदर सोहळ्यात कलाकारांच्या इयत्ता दहावी बारावीच्या परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या पाल्यांचा देखील सन्मान केला जाणार आहे. सोबत महासंघाच्यावतीने आयोजित नवरात्र सोहळ्यातील नवरंग स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना सन्मानित करण्यात येणार आहे. या सोहळ्यात मुंबईतील नामवंत कलाकारांच्यावतीने दिमाखदार नृत्यविष्कारासह सांगितिक कार्यक्रम सुद्धा सादर होणार आहे असे अध्यक्षा कविता घडशी यांनी सांगितले.

## वैद्यकीय मदत कक्षाच्या वाशिम जिल्हा प्रमुखपदी भागवत सावके यांची नियुक्ती..

**दैनिक युवक आधार**
**वाशीम जिल्हा प्रतिनिधी**
**करण धोंगडे**

शिवसेना पक्षाचे प्रमुख माजी मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री आदरणीय एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्या सूचनेनुसार शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या वाशिम जिल्हा प्रमुख पदी माजी युवासेना उपजिल्हाप्रमुख भागवत रामेश्वर सावके यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे.

वैद्यकीय मदत कक्षाची संकल्पना प्रमुख मंगेश चिवटे तसेच शिवसेना वैद्यकीय राज्य प्रमुख रामहरी राऊत यांच्या आदेशाने शिवसेना नेत्या अपराजित खासदार तथा आमदार भावनाताई गवळी पाटील यांच्या वतीने माजी युवा सेना उपजिल्हाप्रमुख भागवत रामेश्वर सावके यांनी केलेल्या आरोग्याच्या कामाची दखल घेऊन त्यांना वाशिम वैद्यकीय मदत कक्षाच्या जिल्हाप्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या माध्यमातून व शिवसेनेच्या माध्यमातून वाशिम जिल्ह्यातील जास्तीत जास्त लोकांची सेवा व त्यांना मदत कशाप्रकारे करता येईल यावर भर द्यावा आणि 'रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा, समजून तत्परतेने काम करावे असे आदेशही सन्माननीय आमदार भावनाताई गवळी पाटील यांनी दिले आहे. यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रकाश महाले पाटील,सुंदर वाटिका झाकलवाडी गट ग्रामपंचायत सरपंच गावडे पाटील,सुरेश पाटील इढोळे, गजानन महाराज,सतीश दुबे, गोपाल लव्हाळे,अमृता पाटील गोरे आदींची उपस्थिती होती.



अपराजित खासदार तथा आमदार भावनाताई गवळी पाटील यांचे भागवत सावके हे निकटवर्ती मानले जातात. गोर,गरीब रुग्णांची सेवा करण्यासाठी तत्पर असतात त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन पुन्हा एकदा सन्माननीय आमदार भावनाताई गवळी पाटील यांनी भागवत सावके यांना वाशिम जिल्हा वैद्यकीय मदत कक्षाची जिम्मेदारी सोपवली आहे...

# कृषी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाने पोखरा योजनेचा दुसरा टप्पा शेतकऱ्यांच्या दारी; गावागावात आशेचे किरण!

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**
**विंचूर :-गोळेगाव ता. निफाड येथे**

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या (पोखरा योजना) दुसऱ्या टप्प्याची सविस्तर माहिती आज गोळेगाव येथील शेतकरी बांधवांना कृषी अधिकारी छाया मोडे यांनी दिली. अत्यंत सोप्या भाषेत योजनेची उद्दिष्ट्ये, त्याचे फायदे आणि अर्ज करण्याची प्रक्रिया समजावून सांगितल्याने शेतकरी बांधवांकडून याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या योजनेमुळे गोळेगावमध्ये शेतीच्या विकासासाठी आशेचे नवे किरण दिसू लागले आहेत. आज सकाळी १० वाजता ग्रामपंचायत कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित विशेष बैठकीत कृषी अधिकारी छाया मोडे यांनी पोखरा योजनेच्या दुसऱ्या टप्प्याला 'शेतीसाठी एक नवी संजीवनी' असे संबोधले. त्या म्हणाल्या, "हवामान



बदलामुळे शेतीत येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा आहे."

पोखरा योजना ही जागतिक बँकेच्या सहाय्याने राबवली जात असून, याचा मुख्य उद्देश हवामान बदलामुळे शेतीवर होणारे नकारात्मक परिणाम कमी करणे आणि शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे हा आहे. कृषी अधिकारी छाया मोडे यांनी योजनेच्या प्रमुख पैलूंवर प्रकाश टाकला: मोडे यांनी शेततळे, विहीर पुनर्भरण, पाझर तलावांचे खोलीकरण आणि गाळ काढणे यांसारख्या जलसंधारण कामांवर विशेष भर दिला. "पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा आहे, आणि पोखरा योजना आपल्याला तो जपायला शिकवते. यामुळे भूजल पातळी वाढण्यास मदत होते," असे त्यांनी स्पष्ट केले. ठिबक सिंचन, तुषार सिंचन यांसारख्या पाणी बचत करणाऱ्या तंत्रज्ञानासोबतच, संरक्षित शेती (पॉलीहाउस, शेडनेट) आणि नवीन पीक पद्धतींचा अवलंब करून कमी पाण्यात जास्त उत्पादन कसे घेता येते, याचे प्रात्यक्षिक त्यांनी दाखवले. यामुळे शेतकऱ्यांना कमी क्षेत्रात अधिक उत्पन्न मिळवणे शक्य होते. शेतकऱ्यांचे उत्पन्न केवळ पिकांवर अवलंबून न राहता वाढावे यासाठी दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन, रेशीम उद्योग आणि मधुमक्खी पालन यांसारख्या शेतीपूरक व्यवसायांना मिळणाऱ्या अनुदानाची माहिती देण्यात आली. यामुळे शेतकऱ्यांना वर्षभर उत्पन्नाचे विविध स्त्रोत उपलब्ध होतात.

जमिनीची सुपीकता टिकवण्यासाठी आणि वाढवण्यासाठी मृदा परीक्षण (SOIL TESTING), सेंद्रिय खतांचा वापर आणि एकात्मिक पीक व्यवस्थापन यावरही भर दिला जातो. यामुळे जमिनीचे आरोग्य सुधारते आणि रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी होते.

योजनेच्या ऑनलाईन अर्ज करण्याच्या प्रक्रियेबद्दल त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले, ज्यामुळे योजनेची अंमलबजावणी अधिक पारदर्शक आणि सुलभ होईल. शेतकऱ्यांना कोणत्याही अडथळ्यांशिवाय योजनेचा लाभ घेता येईल.

यावेळी उपस्थित असलेले शेतकरी दादा मुदगुल म्हणाले, "कृषी साहेबांनी आज आम्हाला खूप चांगली माहिती दिली. आधी आम्हाला योजना खूप क्लिष्ट वाटायची, पण आता ती समजावून घेतल्यावर आम्हाला नक्कीच फायदा होईल असे वाटते." दादा मुदगुल यांनी कृषी अधिकारी छाया मोडे यांचे गावातर्फे आभारही मानले. ग्रामसेवक कविता मिंड, आशा सेविका रोहिणी मुदगुल, ग्रामपंचायतचे सर्व पदाधिकारी आणि गावातील सर्व शेतकरी बांधव या बैठकीला उपस्थित होते. अनेक शेतकऱ्यांनी आपल्या शंका विचारल्या आणि कृषी अधिकाऱ्यांनी त्यांचे समाधान केले. या यशस्वी संवादामुळे पोखरा योजनेचा दुसरा टप्पा शेतकऱ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचला असून, येत्या काळात गोळेगावच्या शेतीत निश्चितच सकारात्मक बदल दिसून येतील, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

# उरणमध्ये प्रथमच जायंट्स वेल्फेअर फाउंडेशन फेडरेशन वन बी तर्फे फॉर्मल प्रेसिडेंट फोरम मीट उत्साहात साजरी.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

उरणमधील भोईर गार्डन कोटनाका येथे रविवार दिनांक ८ जून २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता जायंट्स वेल्फेअर फाउंडेशन फेडरेशन वन बी तर्फे फॉर्मल प्रेसिडेंट फोरम मीट चे आयोजन करण्यात आले होते. विशेष म्हणजे हा दैदिप्यमान सोहळा साजरा होण्यासाठीचा बहुमान होम ग्रुपला म्हणजे उरण जायंट्स ग्रुपला मिळाला होता. आणि हा सन्मान जायंट्स ग्रुपच्या इन्चार्ज प्रियंवदा भिकाजी तांबोटकर यांना मिळाला.

नियोजित वेळेत सायंकाळी ५ वाजता या मिटिंग ची सुरुवात झाली. वेलकम ड्रिंक आणि स्नॅक्स ने पाहुण्यांचे स्वागत झाले. यानंतर उरण जायंट्स ग्रुपच्या अध्यक्षा संगीता ढेरे मॅडम यांनी सुंदर शब्दसुमनांनी गुलाबपुष्प देऊन पाहुण्यांचे स्वागत केले. जायंट्स ग्रुपची प्रार्थना व दीपप्रज्वलन करून या कार्यक्रमाची सुरुवात झाली.

कार्यक्रमासाठी स्पीकर म्हणून सी,सी. एम.एन्ड इन्चार्ज फॉरमर प्रेसिडेंट फोरम मा. दिनकर अमीन सर यांना बोलाविण्यात आले होते. प्रमुख पाहुणे म्हणून वल्ड डेप्युटी चेअरमन मा. पी. सी. जोशी सर लाभले होते.




फेडरेशन वन बी चे अध्यक्ष मा. जायंट विश्वामित्रा भैरवानी यांच्या मार्गदर्शनानुसार हि मिटिंग घेण्यात आली. यासाठी मोलाचे सहकार्य कार्याध्यक्ष मा. एन. सी. एफ. इंजिनिअर सतीश अलगुर यांनी पाहिले. मा. एन सी एफ. उपेंद्र मेनन सर, मा. एन. सी. एफ. ललिता वासन मॅडम, मा. स्पेशल कमिटी मेंबर आनंदराय केणी सर, मा. माजी अध्यक्ष ए. एस. महादेवन सर, या दिग्गजांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमासाठी सचिव म्हणून तृप्ती भोईर यांची नेमणूक करण्यात आली होती.

जायंट्स वेलफेअर फाउंडेशन फेडरेशन वन बी तर्फे फॉर्मल प्रेसिडेंट फोरम मीट साठी पवई, मेट्रो, मुलुंड, घाटकोपर, ठाणे, चेंबूर, पनवेल, सी. बी. डी. अशा विविध शहरातून ५० सदस्य, माजी अध्यक्ष उपस्थित होते. माजी अध्यक्ष त्यांचे कार्य, कर्तव्य,आपल्या ग्रुप साठी असलेले योगदान हे किती महत्त्वाचे असते यावर मा. दिनकर अमीन सरांनी मोलाचे मार्गदर्शन केले. जायंट्स ग्रुप हे एक कुटुंब असून या कुटुंबात प्रत्येकाला आपले नेतृत्व, कर्तुत्व व दातृत्व याची जाणीव असावी. असे सांगितले. यावेळी मा. पी. सी जोशी सरांनी देखील जायंट्स ग्रुपच्या सदस्यांसाठी सकारात्मक दृष्टीकोन वाढीस लागण्यासाठी प्रोत्साहन दिले. आलेल्या सर्व मान्यवरांनी आपले अभ्यासु मत मांडले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जायंट्स ग्रुप उरण च्या सर्व सदस्यांनी आपले योगदान दिले. कौन्सिल मेंबर मा. रोशनलाल मेहता तसेच अध्यक्षा संगीता ढेरे यांना मागील कार्याचा पुरस्कार माजी अध्यक्ष फेडरेशन वन बी चे मा. ए. एस. माधवन सर यांच्या हस्ते गौरवण्यात आले. या मिटिंग मध्ये फेडरेशन लेव्हलला असलेले फॉर्मल प्रेसिडेंट यांना अध्यक्ष फेडरेशन वन बी मा. जायंट विश्वामित्रा भैरवानी यांनी भेटवस्तू देऊन पाहुण्यांचे स्वागत केले.

या सभेसाठी माजी अध्यक्ष विनायक पै, सेक्रेटरी चेतन ठक्कर, माजी अध्यक्ष देवेंद्र पिंपळे सर, सदस्या चैत्राली ठक्कर, सदस्य आनंद ठक्कर, यांचे योगदान महत्त्वाचे आहे.

यावेळी फेडरेशन वन बी चे माजी अध्यक्ष सतीश अलगुर यांचा वाढदिवस केक कापून मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. प्रत्येक सदस्यांतील स्नेहाचे, आपलेपणा चे, सहकार्याचे समंध दृढ होण्यासाठी, आनंदी क्षण वेचण्यासाठी उरण ग्रुप ने विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाच्या आभाराचा भार तृप्ती भोईर मॅडम यांनी उचलला.सर्वांनी स्नेह भोजन घेतले. यावेळी वातावरण अगदी खेळीमेळीचे , मौजमजेचे असे झाले होते. आणि याच हर्षभरित वातावरणात काही हौसी गायकांनी स्व प्रेरणेने स्फुर्ती ने सुंदर गीते गाऊन या कार्यक्रमाची सुंदररीत्या सांगता झाली.

## टँकरची कारला धडक, दोघे जखमी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: टँकरने कारला दिलेल्या धडकेत कारमधील दोघेजण जखमी झाले. या अपघाता प्रकरणी टँकर चालकाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. निळजे, कल्याण, शिळ रोड, डोंबिवली येथील प्रभाकर भामा जाधव हे त्यांची पत्नी सजिथा आणि इतर अशा पाच जणांसह सहा जून रोजी एम एच 43 सीसी 1748 ने भाचीकडे कार्यक्रमासाठी जात होते. मुंब्रा पनवेल हायवेवरील आरएएफ सिग्नलच्या पाठीमागे ते थांबले. यावेळी दुसऱ्या बाजूने विरुद्ध दिशेने टँकर वेगाने त्यांच्या पाठीमागे आला आणि त्यांच्या गाडीला पाठीमागून धडक दिली. जाधव यांची गाडी बाजूला उभे असलेल्या गाडीला जाऊन धडकली. त्यावेळी टँकर चालकाला दिसत नाही का असे बोलले असता त्याने शिवीगाळी केली आणि हातातील रॉड घेऊन खाली उतरला आणि त्यानंतर टँकर चालक व क्लिनर पळून गेले. त्या अपघातात प्रभाकर जाधव आणि त्यांची पत्नी सजीथा ह्या जखमी झाले. पत्नीचा पाय फ्रॅक्चर झाला आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509